**March 08 Lokmat**

# मायक्रो व्हीबीबीमुळे वाहनचोरीला बसणार प्रतिबंध

नवी मुंबई, दि. १३ - गेल्या अनेक वर्षांपासून सुरक्षा उत्पादनांमध्ये आघाडीवर असलेल्या मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने मोबाईल फोन आणि वाहनांच्या सुरक्षेसाठी मायक्रो एसएमएस आणि मायक्रो व्हीबीबी अशी उत्पादने बाजारपेठेत आणण्यात आली आहेत. मायक्रो व्हीबीबी या जादुई बॉक्समुळे वाहनचोरीला प्रतिबंध बसणार आहे.

सुरक्षा उत्पादनांच्या वाढत्या बाजारपेठेत डीलर्स मायक्रो उत्पादनाचा आणि मायक्रो उत्पादनांच्या लायसन्सचा प्रवेश आयसीसीटीम कंपनीशी मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने केलेल्या धोरणात्मक भागीदारीनुसार झाला आहे.

गेल्या २० वर्षांपासून कोलंबिया आय सिस्टीम कंपनी थायलंड आणि दिल्ली इथे सेवेत आहे.

मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीच्या सुरक्षा उत्पादनासाठी थायलंड एक वाढत जाणारी बाजारपेठ आहे. घरे आणि वाहनांच्या वाढत्या सुरक्षेसाठी मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने संपूर्ण संशोधनाने मायक्रो एसएमएस आणि मायक्रो व्हीबीबी अशी उत्पादने बनविली आहेत. थायलंडमधील सुरक्षा उत्पादनांच्या बाजारपेठेत कंपनीची या सुरक्षा उत्पादनांच्या श्रेणीत जास्त लक्ष देण्याची इच्छा आहे, असे मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर मुकुंद गुप्ता यांनी सांगितले.

मायक्रो टेक्नॉलॉजी इंडिया कंपनी वैश्विक दृष्टी असलेली अत्याधुनिक सुरक्षा उत्पादने आणि जोखीम त्या उत्पादने बनविणारी कंपनी आहे. मोबाईल फोन्स आणि वाहने यांच्या सुरक्षेसाठी मायक्रो एसएमएस आणि मायक्रो व्हीबीबी अशी उत्पादने मायक्रो टेक्नॉलॉजी कंपनीने बाजारात आणली आहेत.

या कंपनीच्या उत्पादनांना नावीन्य, अचूकता आणि दर्जासाठी मान्यता आहे.

मायक्रो व्हीबीबी या जादुई बॉक्समुळे शिवाजी पेठेत राहणाऱ्या रविकांत खोत यांची स्कॉर्पिओ गाडी चोरीला जाण्यापासून वाचली. खोत यांनी त्यांची स्कॉर्पिओ घराजवळ पार्क केली होती. ६ फेब्रुवारी २००८ रोजी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास स्कॉर्पिओमधील व्हीबीबी यंत्रामुळे, स्कॉर्पिओ गाडीचा दरवाजा अज्ञात चोरट्यांनी उघडताच खोत यांना एसएमएस आला. त्यानंतर खोत गाडी लावलेल्या ठिकाणी गेले असता त्यांना गाडीमध्ये चोरीच्या उद्देशाने घुसलेले अज्ञात इसम आढळले. पण, खोत यांना पाहताच अज्ञात चोरट्यांनी त्यांची स्कॉर्पिओ सोडून पोबारा केला.